Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेसनोट दि. ०८/१०/२०२०

# अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

## " २० कोटी रुपये किंमतीचे २० किलो मेफेड्रान (एम.डी.) विक्रीसाठी घेऊन जात असलेल्या टोळीस चाकण-शिक्रापुर रोडवर अटक"

मा. श्री. कृष्णप्रकाश सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड परिसरात अंमली पदार्थाचे गैरव्यवहारास प्रतिबंध करण्याचे अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने पिंपरी चिंचवड अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत महाले असे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे स्टाफसह, आळंदी व चाकण पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करुन अंमली पदार्थाचे गैरव्यवहाराचे अनुषंगाने माहीती काढत असताना **मा.पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ सो यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, चाकण-शिक्रापुर रोडने एका निळसर रंगाचे फॉक्सवेगन पोलो कार काळ्या काचा असलेली या गाडीने अंमली पदार्थ घेवुन जात आहेत.** अशी खबर मिळाली.

त्यांनी लागलीच सदरची माहीती वरिष्ठांना दिली असता, वरिष्ठांनी खात्री करुन कारवाई करण्याचे आदेश दिल्याने, पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांनी पोलीस स्टाफसह, **शेल पिंपळगाव मोहीते वाडी धावरदरा येथील चाकण-शिक्रापुर रोडवरील दशमेश पंजाबी ढाबा येथे** सापळा रचुन व **निळसर रंगाची फॉक्सवेगन पोलो कार नं. एमएच १२ एमएल ४७१६ या** गाडीचा पाठलाग करुन, गाडी थांबुन त्यामधील इसमांना त्यांची नावे विचारली असता, **चालकाने त्याचे नाव १) चेतन फक्कड दंडवते, वय २८ वर्षे, रा. मलठण, आंब्रेवस्ती, ता. शिरुर, जि. पुणे असे सांगितले व चालकाशेजारी असणाऱ्या इसमाने त्याचे नाव २) आनंदगीर मधुगिर गोसावी, वय २५ वर्षे, रा. रुईखेडा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव, सध्या रा. बाबुरावनगर, बाफना मळा, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे व चालकाचे पाठीमागे मागील शीटवर बसलेल्या इसमांने त्याचे नाव ३) अक्षय शिवाजी काळे, वय २५ वर्षे, रा. पाचर्णे मळा, शिरुर, जि. पुणे मुळ रा. काळेची वाडी, ता. अकोले, जि. अहमदनगर, पाठीमागे बसलेल्या मधील इसमाने त्याचे नाव ४) संजिवकुमार बन्सीराऊत, वय ४४ वर्षे, रा. सेक्टर १२ बी, कॉर्टर नं. ४१०४, बुकारोस्टील सिटी, झारखंड, सध्या रा. जी ६७, सेक्टर २०, नोएडा, उत्तरप्रदेश, व पाठीमागील डाव्या बाजुस बसलेल्या इसमाने त्याचे नाव ५) तौसिफ हसन मोहम्मद तस्लीम, वय ३१ वर्षे, रा. गंगोई, पो.**

**लालुछाप्रा, थाना पारु, जि. मुजफ्फर नगर, बिहार, सध्या रा. सदरपुर, सोमबाजार, सेक्टर ४५, छेतराम शाळेसमोर, नोएडा, उत्तरप्रदेश,** असे सांगितले, अ.क्रं. ०३, ०४ व ०५ याचे ताब्यातील ट्रॅव्हलींग बॅगमध्ये व चालकाचे ताब्यातील पिशवीमध्ये मिळुन आलेला, **एकुण २०,०५,२३,१००/- रु. किं.चा माल त्यामध्ये २० किलो मेफेड्रॉन (एम.डी.)** हा अंमली पदार्थ, एक निळसर रंगाची फॉक्सवेगन पोलो कार नं. एमएच १२ एमएल ४७१६ व रोख रक्कम इत्यादी जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेतलेले आरोपी हे केमिकल ड्रिस्ट्रीब्युटर या व्यवसायाची निगडीत असुन त्यांचेकडे मिळुन आलेला एवढया मोठ्या प्रमाणात एम.डी. हा अंमली पदार्थ असल्याने त्यांचेविरुध्द चाकण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याचा तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. कृष्णप्रकाश सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड आयुक्तालय, मा. सुधीर हिरेमठ पोलीस उपायुक्त (गुन्हे), सहा.पोलीस आयुक्त मा. राजाराम पाटील, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, सहाय्यक पोलीस फौजदार शाकीर जिनेडी, राजन महाडीक, पोलीस हवालदार प्रदीप शेलार, राजेंद्र बांबळे, शकुर तांबोळी, दिनकर भुजबळ, पोलीस नाईक संदीप पाटील, संतोष दिघे, पोलीस शिपाई प्रसाद जंगीलवाड, संतोष भालेराव, अशोक गारगोटे, दादा धस, प्रसाद कलाटे, शैलेश मगर, अजित कुटे, पांडुरंग फुंदे, प्रदीप गुट्टे व महिला पोलीस शिपाई अनिता यादव यांनी केली आहे.

दाखल गुन्हयाचा **पुढील तपास पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ, अंमली पदार्थ विरोधी पथक, पिंपरी चिंचवड** हे करत आहे.